# प्र क र ण तिसरे

3 रे

## रामदासांचा मनोबोध : मनाचे स्वरुप.

## * प्रकरण – 3 रे *

### रामदासांचा 'मनोबोध'; मनाचे स्वरुप.

**प्रास्ताविक :**

– श्री समर्थ रामदासांच्या साहित्यनिर्मितीत दासबोध, मनाचे श्लोक व करुणाष्टके यांना वेगळेच वैशिष्टय प्राप्त झाले असून त्यांचे स्थानही निर्विवाद आहे. श्री दासबोधात समर्थांचे असलेले जीवनविषयक तत्वचिंतन विस्ताराने आले आहे. त्यांनी मुख्यतः भक्तीतत्वांचेच निरुपण केले आहे. समर्थ म्हणतात, 'भक्तिचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी ।' त्यांनी दासबोधात गुरुशिष्य संवाद रुपाने 'भक्तिमार्ग विशद बोलिला' आहे. मनाच्या श्लोकांत रामदासांनी आपल्या 'मना' शी म्हणजे स्वतःशी केलेला संवाद आहे. म्हणजेच आत्मसंवाद आहे. या संवादात भक्तिमार्गावरुन वाटचाल कशी करावी याचे अतिशय समर्पकपणे व सूक्ष्म असे आरेखन केले आहे. 'मनाची शते' ऐकून सर्वसामान्य माणसांचे सर्व दोष नाहीसे होतील ; मतीमंद माणसेही साधनाला योग्य होतील. अशी ही ग्रंथाची फलश्रुती स्वतः समर्थ रामदासांनी सांगून ठेवली आहे.

जो मानव मनावर विजय मिळवितो तो मानव श्रेष्ठत्व पावतो. माणूस हा मनन, चिंतन करुन सारासार विचार करणारा प्राणी आहे. इतर प्राणीमात्रांनाही मन असते, पण मानवा इतके ते प्रगत नसते. प्राण्यांच्या मनाचा विकास मानवाच्या मनाइतका झालेला नसतो. मानवाच्या प्रगती वा अधोगतीला कारणीभूत मन हेच आहे. मानवाच्या वाटयाला सुख दुःख येतच असते. पण ते सर्व पचवण्याचे मनोधैर्य ज्या मानवाला येते तोच संतत्व पावतो. मानवाच्या बंध वा मोक्षाला मन हेच कारण असते. "मन एवं मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयो"; मनाचा निग्रह हेच सर्वात श्रेष्ठ ज्ञान आहे. "ज्ञानेंद्रियेंच केवळ नव्हेत तर त्या इंद्रियांच्या देवताही मनाच्या आधीन असतात. मन मात्र दुस–या कोणाच्याहीतंत्राने चालत नाही. मनोरुप देव सर्व देवांत अत्यंत श्रेष्ठ आहे. अशा पराक्रमी मनाला जो कोणी आवर घालील तो देवांचाही देव होय". (श्री भागवत 12....23)' जो माणूस मनावर जय मिळवितो तोच खरा ज्ञानी पुरुष होय. एखादा पराक्रमी पुरुष सर्व जगावर विजय प्राप्त करु शकेल, पण मनावर विजय (मिळविलेच असे नाही-मनावर विजय) मिळविणे हे अत्यंत कठीण काम आहे. जो महावीर मनावर विजय मिळवेल तोच खरा साधुपुरुष होय. मन हे बेलगाम घोडयाप्रमाणे चौफर उधळते. त्याला लगाम घालून आपल्या ताब्यात ठेवणारे संतच हे खरे वीर होत. वा–याची मोट बांधवेल, पण या चंचल खोडयात पाडणा–या व प्रतापी मनाचा निग्रह होणे दुर्घट आहे, असे धनुर्धर पार्थाने मनाचे जे वर्णन

13170
A

केले ते खरेच आहे. तथापि अशाही मनाला 'अभ्यास व वैराग्य' ह्या दोन साधनांनी कह्यात ठेवता येते असे योगेश्वर कृष्णाचे त्याला धीराचे उत्तर आहे.[2]

मनाला विषयांपासून सोडविणे म्हणजे वैराग्य आणि अभ्यास, म्हणजे मनाला स्वस्वरुपानुसंधानाच्या खुंटयाला घट्ट बांधून टाकणे. गीतेत भगवंतानी व योगशास्त्रात पतंजलमुनींनी वैराग्य व अभ्यास या दोन साधनांनी मनास जिंकण्यास सांगितले आहे.

मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार ही कारणपरत्वे कल्पनेला दिलेली नावे आहेत. या चार चित्तवृत्ती आहेत. वृत्ती संकल्पविकल्प करते तेंव्हा तिला मन म्हणतात. जिला निंद्य व उत्तम कळते व ज्या दृष्टीने जीव विषयांची परीक्षा करतो, त्याला बुद्धी असे म्हणतात. एखाद्या गोष्टीचे चिंतन केले की तिला चित्त म्हणतात. प्रकृतीच्या पोटात जो गुप्त असतो त्याला अहंकार असे म्हणतात. ~~प्रकृतीच्या पोटात जो गुप्त असतो त्यांला अहंकार असे म्हणतात.~~ मनाला निरनिराळी नावे दिली गेली आहेत. माया, मोह, अहंकार, अविद्या, प्रकृती, शून्य, संसार, कल्पना, जीव ही ती नावे होत. मनाला जिंकण्याचा उपाय म्हणजे ध्यान, मनाची वृत्तीद्वारा अंतर्मुखता प्राप्त करुन घेऊन आत्मशोध करणे म्हणजेच मनाचेच मनावर ताबा मिळविणे. याला परमार्थ असेही म्हणतात. असे हे मन राहते तरी कोठे ? ते आहे तरी कसे ?

हे मन कैसे केवढे । पाहो म्हणो तरी न सापडें ।
ये–हवीं रहाटवया थोडें । त्रैलोक्य यया ।।41।।[3]

मन हे इंद्रिये आणि बुद्धी याच्या मधील जागेत असणा–या रजोगुणांच्या आश्रयाने अतिशय चंचल स्वरुपात राहते. बुद्धी व अहंकार यांच्या मधील जागेत मन बळकट होऊन राहते. जे प्रवृत्तीला मूळ आहे व कामाला ज्याचे बळ आहे आणि जे सतत अहंकार जागृत ठेवते; ज्याच्यामुळे इच्छा सतत वाढत असते, जे आशेचे सतत मनोरे उभारत असते. ज्यामुळे भयाचे संरक्षण होते, ज्यामुळे द्वैत निर्माण होते व अविद्याही निर्माण होते, जे सर्व इंद्रियांना विषयाच्या दरीत लोटते जे आशेचे मनोरे उभे करते व लगेच निराशेने मोडते व जे मनोराज्य रचते, ज्याच्यामुळे बुद्धी सारासार विचार करण्याची आपली ताकद गमावून बसते व जे सर्व भ्रमांचे आगर आहे, असे मन हे वायुतत्वाचे बनले आहे जे बुद्धी व इंद्रिये यांच्या संधित आहे, असे ज्ञानेश्वरांनी मनाचे वर्णन केले आहे. श्रुतीमाऊलींचे असे म्हणणे आहे की, "इंद्रियां पलीकडे मन, मनाच्या पलीकडे बुद्धी आणि बुद्धीच्या पलीकडे परमात्मा आहे"[4] जो मनोबुद्धीवर विजय मिळवितो तो व परमात्मा एकाकार होतात. मनाच्या पलीकडे 'उन्मन' असते. 'उन्मनीच्या सुखाआंत । पांडुरंग भेटी देत' असे जनाबाईने म्हटले आहे.[5]

'मन वढाय वढाय.

जस पिकातलं ढोर '

असे बहिणाबाईंनी मनाचे वर्णन केले आहे. मन हे ओढाळ बैलाप्रमाणे असते. मन हे अतिशय चंचल असते. ते एका क्षणात सर्व त्रिभुवन फिरुन येऊ शकते. ज्याप्रमाणे मुकाच मुक्याच्या खुणा जाणतो, त्याप्रमाणेच मनच मनाला जिंकू शकते. ज्याप्रमाणे बेलगाम घोडा कुठेही धावत सुटतो पण त्याला चुचकारुन लगाम घालता येतो. त्याप्रमाणे वायुवेगाने धावणा-या मनालाही चुचकारुन, गोड बोलून आपल्याला पाहिजे तिकडे वळविता येते. हे वेडे मन ज्याचे चिंतन करते. त्यात ते तद्रूप होते. त्याला नाटक दाखविले की ते नाटकाचाच छंद घेऊन उठते, बरे त्याला कीर्तनांत रंगविले तरी त्याची ना नाही – ते कीर्तनाचाही छंद घेते. जे देखतें तेथेच बिलगतें हा मनाचा धर्म लक्षात घेऊन त्याला विषयाची गोडी न चाखविता आत्मसुखानंद दाखविला तर तेच मन विषयांचा कंटाळा करुन आत्मरामीं रंगेल.[6] पानी तेरा रंग कैसा । जिसमे मिलावे वैसा । याप्रमाणे मनाला तुम्ही ज्या साच्यात घालता त्याप्रमाणे मन घडत जाते. मन हे अवखळ असते. पण त्याला वैराग्याचा आधार घेऊन अभ्यास मार्गाला लावले तर ते काही काळाने स्थिर होते. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण । मोक्ष अथवा बंधन । सुखसमाधान इच्छा ते'।।1।।[7] मनामुळेच माणूस संसारात पडतो व मनामुळेच तो त्यातून सूटका करुन घेते. म्हणजे मन हे बंध व मोक्ष या दोन्हीला कारण बनते. या चंचल मनाला आवर घालून रामरुपी कसे रंगवावे, याची शिकवण रामदासांनी 'मनाच्या श्लोकांत' दिली आहेत.

पुण्याचे कै. वामनराव तळवलकर यांनी 'रामदास रामदासी' ह्या मासिकांत 'मनाचे श्लोक' (Auto - Suggestions) ह्या विषयावर 4/5 लेख लिहून प्रसिद्ध केले होते. पाश्चात्य मानसशास्त्रवेत्ते मनाविषयी काय लिहतात व उपनिषदांत काय म्हटले आहे, या दृष्टीने मनाच्या श्लोकांचा वामनरावांनी विचार केला आहे. त्याच्या निष्कर्ष एवढाच की, मन हे एक नसून दोन आहेत । मानसशास्त्रज्ञ प्राण्याला अनेक मने आहेत असे मानतात व मनुष्याला दोन किंवा तीन मने आहेत असे प्रतिपादन करतात । अर्वाचिन शास्त्रज्ञांनी जागृत मन व निद्रिस्त (स्वप्नस्थ) मन अशी मनाची प्रक्रिया वर्णन केलीं आहे. एक मन जागेपणी काम करते, व दुसरे मन झोपेत स्वप्नांच्या द्वारे काम करते. यालाच स्थूल मन व सूक्ष्म मन असेही म्हटले आहे. मनाच्या श्लोकांत अंतःप्रज्ञ मनालाच उपदेश केला आहे. परंतु समर्थांना दोनही मने अभिप्रेत होती. असे. करुणाष्टकांत देव आणि भक्त या दोघांमधील संवाद आला आहे. भक्तीमार्गावरुन जात असताना पुढे उभ्या असणा-या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी दीन दुबळा भक्त, समर्थ अशा राघवाची करुणा भाकत आहे. भक्तांचे व देवाचे होणारे बोलणे हे भक्तीच्या मार्गावरचे असले तरी ते वगेळया पातळीवरुन होत असते. भक्तांच्या मनात असणा-या भक्तीचे निरनिराळे अविष्कार यांचे

ग्रंथे हृदयस्पर्शी दर्शन करूणाष्टकातून होते. अशाप्रकारे 'दासबोधात' भक्तीचे तत्वदर्शन, 'मनाच्या श्लोकांत भक्तीसाधनेचे दिग्दर्शन आणि 'करूणाष्टकां'त भक्ती भावनेचे संप्रेषण आपल्या प्रत्ययास येते.[9]

समर्थ रामदासांनी भक्तीचे तत्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात कसे आणावे याचे अतिशय सुंदर, सुगम शब्दांत मौलिक असे विवेचन केले असल्यामुळे 'मनाच्या श्लोक' मराठी भाषिकांत अतिशय लोकप्रिय झालेले आहेत. मनाच्या श्लोकांची रचना जरी मराठी भाषेत असली तरी त्यात रामदासांनी दिलेली शिकवण ही संपूर्ण मानव जातीसाठी आहे. मनाच्या श्लोकांचा समश्लोकी अनुवाद वाचल्यावर श्री रमण महर्षी यांनी " मनाचे श्लोक' हे एक दिव्य रत्न आहे.[10] असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे ज्ञानदेवांचा हरिपाठ, श्री एकनाथाचा हरिपाठ त्याप्रमाणे श्री समर्थ रामदास स्वामीचे मनाचे श्लोक ही अध्यात्मपर मराठी साहित्यातील अमर लेणी आहेत. भक्ती कशी करावी याचे मनाच्या श्लोकांइतके सुगम, सरल आणि सखोल असे दर्शन क्वचित पाहावयास सापडते.

मनाच्या श्लोकांचे गुण वर्णन करीत असताना प्रसिध्द समर्थ संशोधक श्री शंकर श्रीकृष्ण देव यांनी पुढील प्रमाणे केले आहे. " श्री समर्थांनी दुसरी कोणतीच ग्रंथरचना केली नसती आणि हे नुसते मनाचे दोनशे पाच श्लोक आपल्यामागे ठेवले असते, तरी तेवढयावरून अद्वितीय राष्ट्रगुरू, असामान्य कवी, अलौकीक भगवत्‌भक्त आणि अपूर्व तत्वज्ञानी म्हणून त्यांचा लौकिक झाला असता." " श्री समर्थांनी आपल्यामागे आमच्यासाठी इतर कोणतीही ग्रंथसंप–ती न ठेवता ही दोनशे पाच रत्नांची नुसती माला ठेवली असती, तरी आम्ही जन्मोजन्मी त्यांच्या चरणांचे दास होऊन त्यांच्या सेवेत देह झिजविले असते."[11] विद्वान पुरूषांनाही मनाच्या श्लोकांचे महत्व वाटत होते. गोंदवलेकर महाराजांनी सुध्दा मनाच्या श्लोकांचे पाठांतरावर भर दिला आहे.[12] आचार्य विनोबा भावे यांनी 'रामदासांची भजने' या आपल्या संपादीत ग्रंथातील प्रस्तावनेत श्री समर्थाविषयी 'आई थोर, तुझे उपकार' अशी कृतज्ञता व्यक्त केली असून मनाच्या श्लोकाबाबत पुढील उद्‌गार काढले आहेत. "मनाचे श्लोक ही मात्र सोन्याची तिजोरीच आहे. दासबोध ही सोन्याची खाण म्हणावी लागेल. खाणीमध्ये अशोधित धातू पडलेला असतो. तो शोधून घ्यावा लागतो. तिजोरीत निखळ सोने साठविलेले असते. मनाचे श्लोक ही रामदासांची अपौरुषेय वाणी आहे."[13]

मनाच्या श्लोकांतील शिकवण समजण्यासाठी निरनिराळया अभ्यासकांनी त्यांचे निरनिराळे आणि निरनिराळया पद्धतीने विभाग केले आहेत. श्री शंकर श्रीकृष्ण देवांनी याचे तीन विभाग पाडले आहेत. '1 ते 66 श्लोक कर्मपर, 67 ते 131 उपासनापर व 132 ते 201 ज्ञानपर आहेत. आणि 202, 203, 204 या तीन श्लोकांत झालेले ज्ञान दृढ होण्याचा मार्ग दाखवून शेवटच्या म्हणजे 205 व्या श्लोकांत फलश्रुती सांगितली आहे.[14] आचार्य विनोबा भावे यांनी दोनच भाग

मानले आहेत ते पुढीलप्रमाणे -- मंगलाचरण श्लोक' शतक पहिले 2 ते 101 श्लोक व शतक दुसरे 102 ते 201 श्लोक, उपसंहार व फलश्रुती 202 ते 205 श्लोक. पहिल्या शतकात सदाचार, ईश्वरनिष्ठा, भक्त अभक्त लक्षण आणि नामःस्मरण हे चार भाग पाडले असून दुस–या शतकात कीर्तन भक्ती, सत्यशोधन, गुरुकृपा–लब्धी असे तीन भाग पाडले आहेत. प्रत्येक विभागानंतर काही आधिकरणांत विभागला आहे.

श्री शि. न. भावे यांनी मनाच्या श्लोकांचे भक्तीपर पूर्वार्ध श्लोक 1 ते 132 आणि ज्ञानपर उत्तरार्ध श्लोक 133 ते 205 असे पूर्वयोग आणि उत्तरयोग विभाग पाडले आहेत. पूर्वार्धात सात आणि उत्तरार्धात चार असेही उपविभाग पाडले आहेत.[15] ह. भ. प. ल. रा. पांगारकारांनी मनाच्या श्लोकांचे सहा विभाग केले असून मंगलचरण श्लोक 1, विवेक वैराग्याचे उद्‌बोधन 2 ते 27, राघवाचा पंथ – सगुणभक्ती श्लोक 28 ते 135, राघवाचा पंथ – निर्गुणबोध श्लोक 136 ते 174, सगुणनिर्गुणातील शुद्धस्वरुप श्लोक 175 ते 201 आणि उपसंहार श्लोक 202 ते 205 असे ते विभाग होत. या प्रत्येक विभागात उपविभागही आहेत. श्लोक एक मंगलचरण, दुस–या भागात दोन उपविभाग, तिस–या भागात अकरा उपविभाग, चौथ्या भागात पाच उपविभाग, पाचव्या भागात तीन उपविभाग, आणि सहाव्या भागात दोन उपविभाग पाडले आहेत.[16]

अरुण गोडबोले यांनी मनाच्या श्लोकांच्या तीन भागात मागोवा घेतला आहे. पहिला भाग 1 ते 66 श्लोक, दुसरा भाग 67 ते 131 श्लोक आणि तिसरा भाग 132 ते 205 श्लोक[17] प्रा. के. वि. बेलसरे यांनी तर मनाच्या श्लोकांचे 32 लहान लहान विभाग पाडले आहेत.[18]

समजण्याच्या दृष्टीने असे विभाग पाडणे गरजेचे असले तरी या प्रकारांची मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. खळाळत्या झ–याप्रमाणे वाहणा–या या काव्यरचनेला निबंधाचा बंदिस्तपणा येणे कधीही शक्य नाही. व तशी अपेक्षा करणेही चूक आहे. समर्थांच्या समोर सबंध जीवनाच्या अध्यात्म साधनेचा विषय एकसंधपणे उभा असल्याने परस्पर संबंध असलेल्या संकल्पनाचा त्या संदर्भानुसार अविष्कार ते करताना दिसतात. जीवनातील एखाद्या लहानश्या घटनेपासून ते मोठया घटनेपर्यंत सर्व बाबतीत ते सविस्तर चर्चा करताना दिसतात. ती सर्व चर्चा एकत्र केली असता त्यातील विविध बाबी एकमेकांत मिसळलेल्या दिसत असल्या तरी शेवटी त्या सर्वांचे आकलन करुन घेतले तर परमार्थ मार्गाचेचे म्हणजे जीवन साधनेचे यथार्थपणे दर्शन घडते. मनाचे श्लोक हे समर्थांच्या आयुष्यभराच्या चिंतनाचे, त्यांनी केलेल्या अभ्यासाचे व त्यांना वेळोवेळी आलेल्या प्रचितीचे सुमधूर व रसाळ असे फळ आहे.

मनोबोध हा विश्व, मानव आणि मानव समूह या बाबतीत मान्य केलेल्या काही मूलभूत अशा तत्वावर आधारीत आहे.[19] हे मनाचे श्लोक वाचत असताना सतत जाणवत राहते. या पायाभूत अशा तत्वांना वेद – उपनिषदे यात सांगितलेल्या परंपरेचा आधार आहे. शास्त्रांतील तत्व – विचार, गुरुपदेश आणि त्यांना स्वतःला आलेला अनुभव यामुळे समर्थांचा त्या मुलभूत अशा तत्वावर असलेला दृढ विश्वाय दिसून येतो. अद्वैत वेदान्ताचा रामदासांनी स्विकार केला होता. हे त्यांच्या मनाच्या श्लोकांत आलेल्या भाषेवरून आणि त्यांनी दिलेल्या उद्हरणांवरून दिसून येते. विश्वाचे अंतिम स्वरूप तो निर्गुण स्वरूप परमेश्वर आसुन तो विश्वमय आहे. त्याच्याशी एकाकार होण्यात म्हणजेच त्याच्यात विलीन होण्यातच मानवी जीवनाची सार्थकता सामावलेली आहे. हीच ईश्वर प्राप्ती होय. हेच खरे अंतिम साध्य होय. हेच खरे आत्मज्ञान होय. अशा आत्मज्ञानाला पूरक आणि पोषक वातावरणाची निर्मिती करणे आणि ती आनंददायक राखणे हाच संपूर्ण मानव जातीचा धर्म आहे. नव्हे ते त्यांचे परमकर्तव्य आहे. या तीन मुलभूत अशा तत्वावर संपूर्ण मनाच्या श्लोकोचा विचार –व्यूह उभारला आहे.

समर्थ रामदास हे हाडाचे शिक्षक असल्याने त्यांनी मनाला समजावून सांगत असताना ते आपले सर्व कौशल्यपणाला लावतात. ते आपल्या नित्यपरिचयातील गोष्टींचा आधार घेऊन आपल्या मनाची तयारी करतात. आपल्याला वाटणारे मरणाचे भय, आपतेष्टांच्या मृत्युमूळे होणारा शोक, घडून गेलेल्या गोष्टींबद्दल मनाला वाटणारे दुःख, संसाराची चिंता, क्षणभंगूर गोष्टीचा मोह, मीपणाच्या अहंकारामुळे निर्माण होणारे दुःख हे सर्व दाखले देतात. आणि आपल्या मनाची अतिशय हळूवारपणी नांगरणी करतात. आणि जीवनात एक परमेश्वराशिवाय काहीही नाही. त्याला जर मनापासून आवाज दिला तर तो आपल्या मदतीला आपल्याशिवाय राहत नाही. अशी जीवनात निर्माण होणाऱ्या आशेची पेरणी करतात. आपण सर्व जण जगतच असतो. या पृथ्वीवर जन्माला येणारा प्रत्येक सजीव मरेपर्यंत आपले जीवन जगतच असतो. या पृथ्वीवर जन्माला येणारा प्रत्येक जीव मरेपर्यंत आपले जीवन जगतच असतो. पण ते जगणे हे सर्वार्थाने जगणे असतेच असे नाही. रामदासांनी केलेला आत्मसंवाद हा सर्वांगणीण झाला आहे. 'मनोबोध' हे समर्थांचे अध्यात्मिक असे चरित्र आहे हे सूक्ष्मपणे पाहिले असता लक्षात येते. श्री शं. श्री. देवांनी तसे म्हटले आहे. समर्थांनी आपल्या जीवनात केलेले प्रयोग मनात ठेवून मनःप्रबोधन केले असल्यामुळे त्या श्लोकांना आत्मप्रत्ययाची धार आणि स्वानुभावाचा अधिकार लाभलेला आहे. या श्लोकांना लाभलेली आधुनिकता आणि नवता ही सुशिक्षित माणसांना जवळची वाटते. हेच या श्लोकांच्या मराठी वाचकांवरील प्रभावाचे रहस्य आहे. जीवन हे निरर्थकपणे जगायचे नसून आपल्या समोर एक ध्येय ठेवून जगायचे असते. ते ध्येय साध्य

करण्यासाठी निश्चयपूर्वक साधना करावी लागते. आणि अशी साधना करण्यातच जीवन कृतार्थ होते. असा जीवनाबाबतचा विचार समर्थांनी स्विकारलेला आहे. व त्याच्या अनुषंगाने त्यांनी मनाच्या श्लोकाचे विवरण केले आहे. संपूर्ण विश्वामध्ये भरुन राहिलेल्या 'अनंत राघवाची' प्राप्ती करुन घेणे हे संबंध मानव जातीचे अंतिम ध्येय आहे. ते ध्येय साध्य करण्यासाठी कोणता मार्ग अवलंबावयाचा हे समर्थांनी आपल्या मनाच्या श्लोकांत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हेच त्यांचे मुख्य ध्येय आहे. मंगलचरणाच्या पहिल्या श्लोकातच 'गमू पंथ आनंत या राघवाचा' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितलेली दिसते.

त्या निर्गुण निराकार परमेश्वराची प्राप्ती होण्यासाठी आपले शुद्ध स्वरुप म्हणजेच 'मी देह आहे' ही भावना लोप पावून 'मी देह नसून मी आत्माच आहे.' ही भावना दृढ होते. मी देह आहे ही भावना म्हणजे देहबुद्धी होय. आणि मी देह नसून मी आत्मा आहे ही भावना म्हणजे आत्मबुद्धी होय. देहबुद्धी आत्मबुद्धीत विलीन होणे म्हणजेच या देहाच्या पिंज--यात अडकून पडलेला मी मुक्त होणे. म्हणजेच त्या निर्गुण निराकार परमेश्वराची प्राप्ती होणे होय. म्हणून समर्थ 'बहुतां दिसां आपुली भेटि झाली । विदेहीपणे सर्व काया निवाली।।' असे म्हणतात. व फलश्रुतीतही त्याचा पुनरुच्चार करतात. 'चढे ज्ञान वैराग्य अंगी। म्हणे दास विश्वासतां मुक्ती भोगी।।' वर उल्लेख केलेले मुलभूत तत्व समर्थांनी स्वतःच 'भक्ती पंथ' म्हणून सांगितले आहे. 'क्रिया पालटे भक्तिपंथेची जावें।' किंवा 'विदेहीपणे भक्ति मार्गेचि जावे।' याप्रमाणे त्यांनी दोन वेळा भक्तीपंथाचाच नामनिर्देश केलेला आहे. 'नको दैन्यवाणें जिणें भक्तिउणे।' अशी त्यांनी भक्तीशून्य जीवनाची निरर्थकता दाखवून दिली आहे. समर्थ ज्याचे भक्तीपंथ म्हणून वर्णन करतात. त्याला भक्तीयोगही म्हणता येईल. परंतू हा भक्तीयोग ज्ञान, कर्म, ध्यान, योग या सर्वांचा विरोधी नसून त्या सर्वांना आपल्यात सामावून घेणारा असा जीवनव्यापी समन्वय योग आहे. समर्थांनी वर्णन केलेली भक्तीची संकल्पना सखोल, भव्योदात्त, विशाल व सर्वस्पर्शी आहे. भक्ती भावना जीवनातील विविध अंगांना कशी स्पर्श करते, वेढते, प्रभावित करते याचे जिवंत चित्र समर्थांनी आपल्या पुढे मांडले आहे. समर्थांनी सांगितलेल्या भक्तीयोगाची सर्वसामान्यपणे आठ अंगे मनाच्या श्लोकात असल्याचे स्पष्टपणे दिसून येते[20]

**समर्थ निरुपित भक्तीयोगाची आठ अंगे :**

**<u>पहिले अंग –</u>** विश्वास किंवा श्रद्धा – भक्तीची सुरुवात विश्वासापासून होते. आपण आज जे जीवन

जगतो आहोत त्यापेक्षाही चांगले उदात्त जीवन आपल्याला जगता येऊ शकेल याबद्‌दल आपल्या मनात विश्वास निर्माण झाला पाहिजे. परमेश्वरा असणे हाही त्या विश्वासाचाच एक भाग आहे. 'अहो ज्या नरा रामविश्वास नाही । तया पामरा बाधिजे सर्व काही॥' संशय, संदेह, पाखंड यानी जीवन निरर्थक बनते. जसा आपला भाव असतो. तसा आपणाला देव दिसतो. देवाच्या नावावर असणार विश्वास सुध्दा महत्त्वाचा असतो. 'हरिकीर्तनीं वृत्तिविश्वास होता॥' यामुळे माणूस मुक्तीसुख भोगतो. अशा प्रकारे विधायक जीवनाचा एक अतिशय महत्वाचा भाग म्हणून समर्थ रामदास विश्वासाकडे पाहताना दिसतात.

<u>**दुसरे अंग :**</u>नीती किंवा सदाचार – भक्तीभाव आणि निती या दोन्हीचाही प्रवास समांतर रेषेत आणि एकमेकांनापूरक असा असतो. समर्थाचा विश्वास होता. स्वार्थबुध्दी आणि अनाचार याला त्यांनी विरोध केला होता. व्यवहारात जे निंद्य आणि वंद्य असते त्यातुन नीतीचे दर्शन होत असते. शुध्द आणि नेमस्त वागणूक हा नीतीचा मुलभूत पाया असतो. आणि स्वधर्माचे पालन करणे हे नीतीचे अंतरंग. असते. 'स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥।' अशा शब्दांत नीती आणि भक्ती यांचा अतूट संबंध श्री समर्थानी सांगितला आहे.

<u>**तिसरे अंग :**</u> नामस्मरण : – ईश्वारप्राप्तीचे सरळ, साधे, सोपे असे साधन म्हणजे नामस्मरण होय. परमेश्वाराचे नुसते नामस्मरण केल्याने मोक्षे मिळू शकतो. त्यांचा भक्तीयोग हा एक दृष्टीने नाम योग आहे. रामदासांनी नामाचे महत्व मनाच्या श्लोकोत ठिकठिकाणी वर्णन केले आहे. नामस्मरण करण्याचे भजन, कीर्तन, चिंतन, ध्यान, जप, भावना इ. विविध मार्ग त्यांनी सांगितले आहेत. नामाचे शोकापहारी आणि सदानंदकारी सामर्थ्य त्यांनी आवर्जून सांगितले आहे. नामचिंतन केल्याने विकसित होणारे ईश्वरपणिधानाचे पर्यवसन कैवल्यात होते. श्री समर्थ म्हणतात, " बहू चांगले नाम या राघवाचे । अती साजिरें सोपे फुकाचें ।। करी मूळ निर्मूळ घेता भवाचो जिवां मानवां हेचि कैवलय साचें।।"

<u>**चौथे अंग:**</u> विवेक : – श्री समर्थ हे अस्तित्ववादी आणि प्रचितीवादी आहेत. तरी पण त्यांचे तत्व–दर्शन बुध्दीविरोधी नाही. त्यांनी बुध्दीनिष्ठ विवेकाचा पुरस्कार केला होतो. त्यांच्या भक्तीयोगातील विवेक ही प्राणभूत संकल्पना आहे. विचार, विवेक आणि विवंचन। ही मानवाची मुलभूत लक्षणे आहेत. 'विचार पाहे तो पुरूषु। विचार न पाहे तो पशू।। नित्य अनित्य, सार – असार, कर्तव्य– अकर्तव्य यामधील असलेला भेद विवेकामुळे समजतो. त्यामुळे जीवनात परिवर्तन घडून येते.

परमेश्वर दर्शनाचा आपणास लाभहोता. मनाच्या श्लोकांचे सार म्हणून रमण महर्षींनी जो श्लोक निर्देशित केला तो असा :- ' देहबुध्दि ते ज्ञानबोध त्यजावी॥ विवेके तये वस्तुची भेट घ्यावी॥ तदाकार हे वृत्ति नाही स्वभावें । म्हणोनी सदा तेंचि शोधीत जावें।।' विवेकामुळे निर्माण होणारे ज्ञान भक्ती – भावनेच्या वाढीस उपयोगी असते. म्हणून रामदास म्हणतात, 'जनी जाणता भक्त होऊनि राहे?'.

**पांचवे अंग** – वैराग्य : विकार आणि संग या दोन्ही गोष्टी मानवाच्या सर्वनाशास कारण होतात. म्हणून त्यांचे नियमन हे जीवन साधनेचे एक महत्वाचे अंग मानले आहे. ते माणसाच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते. विकारांवर ताबा मिळविता आल्याशिवाय व अलिप्तपणा अंगी बाणल्याशिवाय उच्च जीवनमूल्यांची धारणा आणि साधना शक्य होत नाही. या वृत्तीचेचे 'वैराग्य' हे नाव पूर्वापार चालत आलेले आहे. दास, योगी, आणि सद्गुरु या सर्वांची वर्णने समर्थांनी आपल्या मनाच्या श्लोकांत केली आहेत. दास हा उदासीन असतो, योगी हा वितरागी असतो आणि सद्गुरु विरागी असतो असे समर्थ सांगतात. काम निवृत्ती हा वैराग्याचा अर्थ समर्थांना अभिप्रेत नसून सर्व वृत्ती ईश्वराभिमुख करणे हा वैराग्याचा अर्थ त्यांना महत्वाचा वाटतो. म्हणून ते म्हणतात, 'मना कामना वासुदेवीं वसों दे । मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे।।'

**सहावे अंग** – सज्जन आणि सद्गुरु यांची संगती : विविध प्रकारच्या कारणांनी विकृत झालेले मानवी जीवन प्रकाशाने उजळून स्वच्छ, पवित्र आणि प्रसादपूर्ण करण्यासाठी सद्गुणी माणसांचा सहवास आणि अनुभवी मंडळींचे मार्गदर्शन आवश्यक असते. भारतीय साधन विचाराने तो साधनेचा एक अत्यावश्यक भाग समजला आहे. संत, सज्जन आणि सद्गुरु यांना साधक जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. 'करी वृत्ति जो संत तो संत जाणा। अशी संत या शब्दाची समर्थांनी फोड केली आहे. व सज्जनांच्या सहवासात राहिल्यामुळे जीवनात समाधान मिळते. आणि सद्गुरू तर आपल्याला प्रत्यक्ष परमेश्वराचेच दर्शन घडवितो. ' जगीं थोरला देव तो चोरलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ।'

**सातवे अंग :** कृतिशीलता : – प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही बाबतीत कृतिला महत्व आहे. त्या केवळ बोलण्याच्या गोष्टी नाहीत. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे।' म्हणून समर्थांनी कृतीशील जीवनाचा पुरस्कार केलेला आहे. आणि कृतीशून्य जीवनाची निरर्थकता पदोपदी पटवून दिली आहे. आपल्याला जर प्रचिती हवी असेल तर प्रबोधनाला प्रयत्नांची जोड देणे आवश्यक आहे. कोणतीही गोष्ट जाणीवपुर्वक करावी लागते म्हणजे त्या गोष्टीत रस घेतल्याशिवाय किंवा ती गोष्ट आस्थापूर्वक केल्याशिवाय, समर्थांच्याच शब्दात सांगायचे तर 'अती आदरें' केल्याशिवाय ते पूर्ण होणार नाही. आदर आणि आस्था ह्या कृतीप्रवणतेला जन्म देतात. आळस आणि आत्मकेंद्रीवृत्ती ह्यांचा त्याग केल्याशिवाय कृतिशीलता निर्माण होणार नाही. उक्तीप्रमाणे आचार, लोक– सेवा इ. प्रकारे कृतिशीलता व्यक्त होत नाही. भक्तीयोगात कर्म–कौशल्य अभिप्रेत आहे.

**आठवे अंग :** स्वरूप–ज्ञान आणि स्वरूपानंद : – सर्वत्र ऐक्याची भेदभेद नसलेली दिव्य अनुभूती हे भक्ती साधनेला आलेले रसाळ फळ आहे. मानवाच्या आध्यात्मिक विकासाला मिळालेली ती एक प्रगल्भ निरामय आणि सुखप्रद भाव स्थिती आहे. तिचे वर्णन करता येत नाही. म्हणजेच ती अवर्णनीय आहे. मीपणाचा अहंकार गळून पडला की आपले वेगळे असे अस्तित्वच शिल्लक राहत नाही. तो व आपण एकाकार होऊन जातो. तेथे फक्त स्वरूप ज्ञान म्हणजे परमानंद प्राप्त होते. या स्थितीचे समर्थांनी अतिशय सुंदर वर्णन केले आहे.'कळे आकळे रूप ते ज्ञान होता तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था। उन्मनीं शब्द कुंठीत राहे तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहें। वर सांगितलेला समर्थांचा भक्ती योग आठ अंगांनी एक पूर्ण योगच बनतो. जीवनातील कोणतेही अंग, स्तर, अंश किंवा कक्षा या पूर्णयोगाच्या कार्यक्षेत्राबाहेर राहून शकत नाहीत. संपूर्ण जीवन प्रकाशमान होते. जीवनात काहीच न्यूनता राहत नाही, तर जीवनात आनंद निर्माण होतो, तेथे आनंदभुवनच निर्माण होते.

श्री रामदासांनी मनाच्या श्लोकांत सांगितलेला भक्ती-योग हा मानवाच्या भावजीवनाची रूपरेखा आहे. त्याची पुन्हा साकल्याने मांडणी करायची म्हणजे त्याच्या मानसशास्त्रीय आलेखन करणे होय, असे म्हणता येईल. मानवी जीवनातील दुःखातून आनंद प्राप्त करुन घेण्यासाठी समर्थांनी सांगितलेला तो एक सुकर मार्ग आहे. दुःखातून आनंदाकडे जाण्यासाठी श्री समर्थांनी अधिकारवाणीने शिफारस केलेला तो एक विवेकप्रधान भावनिक मानसोपचार आहे असेही म्हणता येईल. व्यक्तित्वाचे संघटन करणाऱ्या वृत्ती आणि भावना यांचे संवर्धन हे या मानसोपचाराचे द्विविध स्वरुप आहे. मानवी स्वभावातील दोषांचा समर्थांनी निषेध केला आहे. ते दोष असे–काम, क्रोध, लोभ, मत्सर, दंभ, दुःख, शोक, चिंता, खेद, भय, संताप, क्षोभ, मद, अहंता, मोह, भ्रम, भ्रांति, चांचल्य, दैन्य, जल्प, संदेह, विकल्प, वासना, वादविवाद, पाखंड इ. त्याचप्रमाणे त्यांनी मानवी स्वभावातील गुणांचेही वर्णन केले आहे. ते गुण असे; धारिष्ट, सहनशीलता, नम्रता, सेवाभाव, दया, निश्चय, समाधान, दक्षता, एकाग्रता, प्रीती, तप, आर्जव, सुवाचा, एकांत सेवन, मार्दव, आदर, वैराग्य, क्षमा, शांती, अनुराग, मनस्विता, भक्तिभाव, ज्ञानबोध, संतत्व, सत्य संकल्प, निवविणे इत्यादी.मानवी व्यक्तिमत्वाची सदोष घडण म्हणजे एकात्मतेकडे वाटचाल होय. ही वाटचाल प्रमुखपणे अंतर्मनात होते. आपल्या मनाची सर्व शक्ती एकत्रित करुन ती मूलतत्वाशी संघटीत करावी. म्हणून समर्थ म्हणतात – 'सूत गुंतले तें उकलावें। तैसे मन उगवावें। मानत मानत घालावें । मुळाकडे।।'

जातो.

श्री समर्थांचा भक्तियोग हा मानवी मनाला अती उच्च पातळीवर घेऊन जाते. त्यामुळे ज्ञानवैराग्य आणि सामर्थ्य निर्माण होते. मानवाच्या ईश्वरार्पण भावनेतच जीवनाचे अंतिन सार सामावलेले आहे. म्हणून तो समर्पण योग आहे. हा योग सहजशक्य नाही तसा तो अगदी अशक्य पण नाही. 'क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो । दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो।' असा परमेश्वर-कृपेविषयी श्री रामदासांनीच विश्वास प्रगट केला आहे. मनाच्या श्लोकांत समर्थांनी समर्पण भावनेचा गंभीर, खोल, आणि जीवनव्यापी अर्थ सांगून ठेवला आहे असे दिसून येते.

****************

## मनोबोधांतील विषयावस्था


| | विषय | श्लोक |
|---|---|---|
| 1. | मंगलाचरण | 1 |
| 2. | विवेकवैराग्याचे उद्‌बोधन | 2 ते 10 |
| अ– | हरिभक्ति व सदाचार | 2 ते 10 |
| ब– | वैराग्याचे उद्दीपन | 11 ते 27 |
| 3. | राघवपंथ व सगुणभक्ती | |
| अ– | नुपेक्षी कदा रामदासाभक्तीमानी | 28 ते 37 |
| ब– | मना सज्जना राघवी वस्तीकीजे | 38 ते 46 |
| क– | जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा | 47 ते 66 |
| ड– | निष्काम व वादविरोध | 57 ते 66 |
| इ– | प्रभाते मनी राम चिंतित जावा | 67 ते 76 |
| ई– | रामविश्वास | 77 ते 80 |
| उ– | नामस्मरण | 81 ते 102 |
| ऊ– | क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे | 103 ते 105 |
| ए– | नुरे वाद संवाद तो हितकारी | 106 ते 115 |
| ऐ– | नुपेक्षा कदा देव भक्ताभिमानी | 116 ते 127 |
| ओ– | सत्संगांत रामभक्ती | 128 ते 135 |
| 4. | राघवाचा पंथ – निर्गुण बोध | |
| अ– | जुने ठेवणे | 136 ते 144 |
| ब– | मना संत अनंत शोधुनि पाहे. | 145 ते 150 |
| क– | समाधान ते सज्जनाचिनि योगे | 151 ते 155 |
| ड– | मना सर्व जाणीव सांडून राहे | 156 ते 162 |
| इ– | सद्‌संगात देहबुद्धी सोडून आत्मबुद्धी करावी | 163 ते 174 |
| 5. | सगुण-निर्गुणात शुद्ध स्वरुप. | |
| अ.– | थोरला देव – केवलब्रह्म | 175 ते 179 |

| | | |
|---|---|---|
| ब– | भोंदु गुरु नकोत, सद्गुरु पाहिजेत. | 180 ते 183 |
| क– | संग सोडून मुख्य देवाला भजावे | 184 ते 201 |
| 6. | उपसंहार. | |
| अ– | साध्य होऊनी साधन करावे. | 202 ते 204 |
| ब– | फलश्रुती. | 205 |


*****

# * संदर्भ – सूची *


1. ल. रा. पांगारकर, 'मराठी वाड्.मयाचा इतिहास' खंड तिसरा, केशव भिकाजी ढवळे – श्रीसमर्थ सदन, गिरगांव मुंबई – 1940, पान नंबर 497.

2. तत्रैव – पान नंबर 497.

3. तत्रैव – पान नंबर 498.

4. तत्रैव – पान नंबर 499.

5. तत्रैव – पान नंबर 499.

6. तत्रैव – पान नंबर 499.

7. तत्रैव – पान नंबर 501.

8. तत्रैव – पान नंबर 501.

9. श्या. गो. मुद्गल, श्री. र. कावळे, अनिरुद्ध कुलकर्णी संपादित 'समर्थ दर्शन', (प्राचार्य दांडेर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वाड्.मय प्रकाशन मंडळ.) प्रथम आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1982 पाननंबर 21.

10. तत्रैव – पान नंबर 21.

11. शं. श्री. देव – 'समर्थ चरित्र'

12. के. वि बेलसरे – 'सार्थ मनाचे श्लोक' पुर्नमुद्रण, चिटणीस, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड सातारा, 1996, प्रस्तावना पान नंबर – 8.

13. श्या. गो. मुद्गल, श्री. र. कावळे, अनिरुद्ध कुलकर्णी संपादित 'समर्थ दर्शन' प्रथम आवृत्ती, (प्राचार्य दांडेकर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वाड्.मय प्रकाशन मंडळ) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1982 पान नंबर 21.

14. शं.श्री. देव – 'समर्थ चरित्र'

15. श्या. गो. मुद्गल, श्री. र. कावळे, अनिरुद्ध कुलकर्णी संपादीत 'समर्थ दर्शन' प्रथम आवृत्ती, (प्राचार्य दांडेकर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वाड्.मय प्रकाशन मंडळ) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1982 पान नंबर – 23.

16. ल. रा. पांगारकर, 'मराठी वाड्.मयाचा इतिहास' खंड तिसरा, केशव भिकाजी ढवळे – श्रीसमर्थ सदन, गिरगांव – मुंबई 1940.

17. अरुण गोडबोले – 'श्री मनाचे श्लोक' एक मागोवा, प्रथम आवृत्ती, कौशिक प्रकाशन, सातारा, डिसेंबर 1993, एक मागोवा.

18. के. वि. बेलसरे, 'सार्थ मनाचे श्लोक' पुनर्मुद्रण, चिटणीस श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, – सातारा, 1996.

19. श्या. गो. मुदगल, श्री र. कावळे, अनिरुद्ध कुलकर्णी संपादित, 'समर्थ दर्शन' प्रथम आवृत्ती, (प्राचार्य दांडेकर धार्मिक, शैक्षणिक, व सांस्कृतिक वाड्.मय प्रकाशन मंडळ) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1982, पान नंबर – 23.

20. तत्रैव – पान नंबर 26.

*****